# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी, बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र : तंशिविकापु/संकीर्ण /शै.वि.-४/२०२५/४३२ दिनांक : १०.०३.२०२५

**परिपत्रक-** 10 MAR 2025

**प्रति,**
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व संस्था, पुणे विभाग

**विषय : शै.व.२०२४-२५ करिता, डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांकरिता SEBC व विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यातबाबत...**

संदर्भ- संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/११४ दि.२४.०२.२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या डीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण विभागाच्या खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.

२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना.

उपरोक्त योजनांतर्गत, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०२५ रोजी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व निर्वाहभत्ता योजनांच्या अंमलबजावणीबाबत बैठक घेण्यात आली व सदर बैठकीमध्ये उपरोक्त नमुद योजना राबविणाऱ्या प्रशासकीय विभागांनी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर योजनांच्या अंमलबजावणीबाबत कळविले आहे.

तरी सर्व संस्थांनी **सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्रातील १ ते ५ मुद्यांप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.**

सोबत- संदर्भिय पत्र.

**( डॉ. द. व्यं. जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/ ९९४
दिनांक:- २४/०२/२०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

**विषय:- शै.वर्ष २०२४-२५ करिता, डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांकरिता SEBC विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्याबाबत...**

संदर्भ:-१. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.२७/तांशि-०४ दि.१४/०२/२०२५ द्वारे प्राप्त मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०२५ रोजीच्या SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व निर्वाहभत्ता योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
२. सामान्य प्रशासन विभाग शा.नि क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५(भाग-१)/आरक्षण-५ दि.२९/०१/२०२५

महाराष्ट्र शासनाच्या डीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना

उपरोक्त योजनांतर्गत, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०२५ रोजी **SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व निर्वाहभत्ता योजनांच्या अंमलबजावणीबाबत** बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीच्या इतिवृत्तामध्ये उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना राबविणाऱ्या संबंधित प्रशासकीय विभागांनी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी दोन्ही योजना राबविण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सोबत बैठकीचे इतिवृत्त जोडले आहे.

तरी इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशानुसार सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या **सर्व संस्थांना खालीलप्रमाणे सूचित करावे.**

१. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना** या दोन्ही योजना **SEBC प्रवर्गातील** विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असल्याबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी व **संस्थास्तरांवर विशेष मोहिम** राबवून योजनासाठी पात्र असलेल्या **SEBC प्रवर्गातील** विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज तात्काळ भरुन घ्यावेत.

शै.वि
२८/०२/२५



तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
28 FEB 2025
आवक क्र. 1319

२. **SEBC प्रवर्गातील** एकही पात्र विद्यार्थी सदर योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता स्वत: संबंधित संस्था प्राचार्यांनी घ्यावी.

३. तसेच, संस्था स्तरांवर प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे भरलेले अर्ज प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढावे आणि

४. दि.२९ जानेवारी २०२५ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता **उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.** तरी सर्व संस्थांनी, सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्याबाबत तात्काळ कळवून त्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्यात यावे.

५. जर यापूर्वी डीबीटी पोर्टलवर **SEBC प्रवर्गातील** विद्यार्थ्यांनी उत्पन्नाचा दाखला सादर करुन अर्ज भरले असतील तर ते सर्व अर्ज विद्यार्थ्यांना परत करुन व त्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना तात्काळ कळवून संदर्भीय क्र. २ च्या शासन निर्णयान्वये **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रासह** डीबीटी पोर्टलवर मुदतीच्या आत अर्ज जमा करण्याबाबत कळविण्यात यावे. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

**तसेच, सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, SEBC प्रवर्गातील** विद्यार्थ्यांना सदर योजनांतर्गत अनुज्ञेय असलेल्या योजनेच्या लाभासाठी अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी संबंधित विभागीय कार्यालयांनी विशेष मोहिम राबवून त्यांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व संस्थांसोबत बैठक घेऊन सदर योजनांच्या प्रगतीचा आढावा दर पंधरा दिवसांनी किमान एक वेळा घेण्यात यावा.

तसेच, तसेच शै. वर्ष २०२४-२५ साठी डीबीटी पोर्टलवर विभागीय कार्यालयाच्या लॉगीन आयडीमध्ये **SEBC प्रवर्गातील** उपरोक्त योजनांचे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झालेले/प्राप्त होणारे संस्था स्तरांवर मंजूर झालेले अर्जांची **(Pending at Department अंतर्गत)** तपासणी करताना ज्या विद्यर्थ्यांनी **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र** अपलोड केले असेल तर अशा विद्यर्थ्यांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढावे आणि,

जर शै. वर्ष २०२४-२५ साठी डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्याने अर्ज भरतेवळी **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र** अपलोड केले नसेल तर अशा विद्यार्थ्यांचे अर्ज **"उत्पन्नाच्या दाखला ऐवजी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र अपलोड करुन अर्ज भरण्याच्या मुदतीच्या आत पुन्हा जमा करावे "** ( Remarks- Instead of Income Certificate upload the "Non_Creamy layer Certificate and Resubmit the Application before last date of submission ) परत पाठवून संबंधित संस्थांना संबंधित विद्यार्थ्याकडून **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र** अपलोड करण्याबाबत सुचित करावे व अर्ज मुदतीच्या आत पुन्हा जमा करण्याबाबत कळविण्यात यावे.जेणेकरुन सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देखील योजनेचा लाभ देता येईल.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.
( लक्षवेध-श्री. अजितकुमार थोरात, कक्ष अधिकारी )



28 FEB 2025

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२२०४०९३५

Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्रमांक : बैठक-२०२५/प्र.क्र. २७/तांशि-४

दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२५

तात्काळ

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

३) प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई

४) सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई

५) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

६) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भातील बैठकीबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०२५ रोजी त्यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक संपन्न झाली आहे. सदरहू बैठकीचे इतिवृत्त पुढील आवश्यक तात्काळ कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

(संतोष पु. खोरगडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई.

C:\Users\shahjahan.mulani\Desktop\A\\२०२५\शिष्यवृत्ती आढावा बैठक - इतिवृत्त\SEBC बैठक - दि.०५.०२.२०२५.docx

३) मुख्य परिचलन अधिकारी, महाआयटी, एपीजेय हाऊस, मुंबई.
४) संबंधित विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित संचालनालये / आयुक्तालये (संबंधित विभागांमार्फत).
५) सह सचिव (तंशि)/ उप सचिव (मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत :-

१) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्य मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (इतर मागास व बहुजन कल्याण) यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (साविस/सामान्य प्रशासन विभाग) यांचे स्वीय्य सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) सह सचिव, मा. मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (तांशि-४).

# बैठकीचे इतिवृत्त

विषय :- मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात झालेल्या बैठकीबाबत..

मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेच्या अंमलबजावणीबाबत दि.०५.०२.२०२५ रोजी दु.०३.३० वा. बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मंत्री महोदयांनी अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांना उपरोक्त संदर्भात मा.मुख्य सचिव यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा. त्यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस संबंधित प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्यानुषंगाने मा.मुख्य सचिव यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत :-

| अ. क्र. | उपस्थित करण्यात आलेला मुद्दा | मा. मुख्य सचिव यांचे निर्देश | कार्यवाही करणारा विभाग / कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०२४-२५ करिता राबविण्याबाबत व यासंदर्भात सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाकरिता आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत... | १) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना राबविणाऱ्या संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) सदर योजना सन २०२४-२५ करिता SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्याची कार्यवाही करावी.<br>२) या योजनेंतर्गत SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या सन २०२४-२५ च्या शिष्यवृत्तीकरिता सद्यस्थितीतील लेखाशिर्षांतर्गत आवश्यक अतिरिक्त निधीची मागणी संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) पुरवणी मागणीद्वारे करावी.<br>३) SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता सदर योजना सन २०२५-२६ करिता राबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही जसे की - स्वतंत्र लेखाशिर्ष, निधीची तरतूद इ. बाबतची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग इ. तसेच, वित्त विभाग. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) करावी. | |
| २ | SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना सन २०२४-२५ करिता राबविण्याबाबत व यासंदर्भात सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाकरिता आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत... | १) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना राबविणाऱ्या संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) सदर योजना सन २०२४-२५ करिता SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्याची कार्यवाही करावी.<br>२) या योजनेंतर्गत SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या सन २०२४-२५ च्या निर्वाह भत्त्या करिता सद्यस्थितीतील लेखाशिर्षांतर्गत आवश्यक अतिरिक्त निधीची मागणी संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) पुरवणी मागणीद्वारे करावी.<br>३) SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता सदर योजना सन २०२५-२६ करिता राबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही जसे की - स्वतंत्र लेखाशिर्ष, निधीची तरतूद इ. बाबतची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांनी (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग, इ.) करावी.<br>४) ही योजना राबविणाऱ्या संबंधित विभागांनी या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्त्याचे दर हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्याप्रमाणे नसतील तर, सदर शासन निर्णयात नमूद अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त केलेल्या समितीच्या मान्यतेने सदर दर एकसमान करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि व पदुम विभाग इ. तसेच, वित्त विभाग. |

| | | | |
|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत. | प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असल्याबाबत व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी.<br>२) SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर योजनांतर्गत अनुज्ञेय असलेल्या शिष्यवृत्तीकरिता अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी संबंधित संचालनालय / आयुक्तालय यांच्यामार्फत संबंधित संस्थास्तरावर विशेष मोहिम राबविण्यात यावी.<br>३) संस्थास्तरावर राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेचा आढावा संबंधित संचालनालय / आयुक्तालय यांनी वेळोवेळी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात यावा.<br>४) SEBC प्रवर्गातील एकही पात्र विद्यार्थी सदर दोन्ही योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.<br>५) सदर योजनेच्या प्रगतीचा आढावा संबंधित संचालनालय / आयुक्तालय यांनी प्रत्येक महिन्यातून किमान एकवेळा घ्यावा. | अधिपत्याखालील सर्व संबंधित संचालनालये / आयुक्तालये |
| ४ | SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेताना येणाऱ्या अडचणींबाबत. | सर्व संबंधित जात पडताळणी समित्यांना, SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक निर्देश देण्यात यावेत. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

***************

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ७५ (भाग-१)/आरक्षण-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - २९ जानेवारी , २०२५

संदर्भ-

१. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दि.२६.०२.२०२४
२. समक्रमांकाचे शासन परिपत्रक दि.११.०३.२०२४, ०५.०७.२०२४
३. समक्रमांकाचे शासन शुद्धीपत्रक दि.१५.०३.२०२४, २८.०६.२०२४
४. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.सारथी २०२०/प्र.क्र.३५ (भाग-२)/महामंडळे, दि.१४.०९.२०२०
५. शासन शुद्धीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दिनांक २०.०९.२०२४

प्रस्तावना -

राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण (एसईबीसी) अधिनियम, २०२४ संदर्भ क्र. १ येथील अधिनियमान्वये राज्यात अंमलात आला असून याअन्वये राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील सरळसेवांमधील नियुक्तीसाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.२ व ३ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये इतर मागास बहुजन कल्याण विभागाने राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द केली असून

त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे. या तरतूदीच्या धर्तीवर राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीही सदर तरतूद लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात येत असून नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०१२९१३३८५५४६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRASHANT SURESH WAMAN

Digitally signed by PRASHANT SURESH WAMAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, [illegible]
Date: 2025.01.29 13:40:13 +05'30'

(प्रशांत वासन)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य/संसद सदस्य
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.
१६) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८) मुख्य महानगर दंडाधिकारी,
१९) सर्व विभागीय आयुक्त.
२०) सर्व जिल्हाधिकारी,
२१) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,
२२) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
२३) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२४) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२५) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२६) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२७) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२८) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२९) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
३०) सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात,
३१) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
३२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३३) सर्व जिल्हा परिषदाचे समाजकल्याण अधिकारी
३४) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
३५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३६) निवड नस्ती, आरक्षण-५